# TickMark.Ai
Mumbai

**Class:** EM - CLASS 9 | **Subject:** Marathi | **Time:**1 hrs
**Date:** 04-08-2025 | **Paper:** Unit 1 | **Marks:**20

**Q1) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** **(7)**

(1) घटनेनुसार वाक्यांचा क्रम लावा: (2)

(1) दहा डब्यांची माळका खुशाल चालली होती.
(2) बरोबर पाच वाजता कूडक शिटीचा कर्णा फुंकला.
(3) कलियुगातील विंग्रेजी चमत्कार पाहायला लोक आ वासून उभी होती.
(4) भकभक, फकफक प्रवासाला सुरुवात केली.

मुंबई प्रांतात रेल्वे असावी असा उठाव मुंबईला प्रथम सर जमशेटजी जिजीभाई आणि जगन्नाथ नाना शंकरशेट यांनी केला. मूळजी जेठा मोरारजी गोकुळदास, आदमजी पीरभाई, डेविड ससून वैगैरे अनेक नामांकित नगरशेटजींचे अर्थात त्यांना पाठबळ होतेच. सन १८५३ मध्ये ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वेचा पहिला छोटा फाटा मुंबई ते ठाणेपर्यंत एकेरी रस्त्याचा तयार झाला. लोखंडी रुळावरून इंग्रज आगीनगाडी चालवणार, ही कल्पनाच लोकांना मोठी अचंब्याची वाटली.

अखेर मुहूर्ताचा दिवस जाहीर झाला. दिनांक १८ एप्रिल सन १८५३, सोमवार रोजी सायंकाळी ५ वाजता पहिली आगगाडी मुंबईहून निघाली. पाना-फुलांचे हार, तोरणे, निशाणे लावून १० मोठे खोलीवजा डबे शृंगारलेले. इंजिनावर अंग्रेजांचे मोठे निशाण फडकत आहे. डब्यांत गादीच्या खुर्च्या, कोच यांवर रेल्वेचे सगळे डायरेक्टर, सर जमशेटजी जीजीभाई, नाना शंकरशेट आणि अनेक इतर नगरशेट जामानिमा करून बसलेले. बरोबर पाच वाजता आगगाडीने कूडक शिटीचा कर्णा फुंकून आपल्या अकभक, फकफक प्रवासाला सुरुवात केली. मुंबई ते ठाणे दुतर्फा लाखांवर लोक कलियुगातला हा विंग्रेजी चमत्कार पाहायला आ वासून उभे होते. ना बैल, ना रेडा, ना घोडा आणि वाफेच्या जोरावर एक नाही, दोन नाही, दहा डब्यांची माळका खुशाल चालली आहे झुकझुक करत लोखंडी रुळांवरून! कमाल आहे बुवा या विंग्रेजांची आता तर काय? विस्तव आणि पाणी यांची सांगड घालून विंग्रेजांनी! वाफेलाच गाडी ओढायला लावले!

(2) एका वाक्यात उत्तरे लिहा: (2)

(1) लाखांवर लोक आ वासून उभे कशासाठी असत ?
(2) कोणत्या दिवशी व किती वाजता पहिली आगगाडी मुंबईहून निघाला ?

(3) भारतात पहिल्यांदा धावणाऱ्या रेल्वेकडे बघून त्या काळातील लोकांना काय वाटले असेल ? तुमच्या शब्दात लिहा. (3)

**Q2) कवितेच्या आधारे सुचनेनुसार कृती करा :** **(8)**

(1) योग्य पर्याय निवडा : (2)

(1) आस लागणे म्हणजे .................... .
(i) उत्कंठा वाढणे (ii) ध्यास लागणे (iii) घाई होणे (iv) तहान लागणे
(2) वाटुली म्हणजे .................... .
(i) घाटूली (ii) वाट (iii) वळण (iv) वाट पाहणे

भेटीलागीं जीवा लागलीसे आस ।
पाहे रात्रंदिवस वाट तुझी ।।१।।

पूर्णिमेचा चंद्रमा चकोराजीवन ।
तैसें माझें मन वाट पाहे ।।२।।

दिवाळीच्या मुळा लेंकीं आसावली ।
पाहातसे वाटुली पंढरीची ।।३।।

भुकेलिवा बाळ अति शोक करी ।
वाट पाहे उरि माउलीची ।।४।।

तुका म्हणे मज लागलीसे भूक ।
धांवूनि श्रीमुख दांवी देवा ।।५।।

(2) तक्ता पूर्ण करा : (2)

| वाट बघणारा | कोणाची वाट बघतो | वाट बघण्याचे कारण |
|---|---|---|
| १. भुकेलेले बाळ | ..................... | ..................... |
| २. ..................... | पांडुरंगाची | ..................... |

(3) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा : (2)
(1) लेकी - (2) वाटुली -

(4) पूर्णिमेचा चंद्रमा चकोराजीवन |
तैसे माझे मन वाट पाहे || या ओळीतील काव्यसौंदर्य स्पष्ट करा. (2)

**Q3) व्याकरण घटकांवर आधारित कृती : (5)**

(1) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा (1)
लेख लिहणारा -

(2) खालील शब्दांचे लिंग ओळखा (1)
(i) प्रदेश -
(ii) जमीन -

(3) कंसातील सूचनेनुसार वाक्य रुपांतर करून वाक्ये पुन्हा लिहा (1)
हा प्रश्न अनुत्तरीत आहे. (नकारार्थी करा)

(4) गटात न बसणारा शब्द लिहा (1)
पिंपळ, झाड, वड, चिंच, आंबा

(5) खालील शब्दांचे वचन बदला (1)
(i) फूल -
(ii) आंबा -

All the Best

TickMark.Ai